गोंदण करणे

व्हीटीलिगो झालेल्या त्वचेवर गोंदण करणे आणि कॉस्मेटिक कॅमोफ्लाजमुळे पांढरे चट्टे झाकण्यास मदत होते.

त्वचेचे संरक्षण

सूर्यापासून व्हीटीलिगो झालेल्या त्वचेचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे आणि सनस्क्रीन तसेच पूर्ण बाह्यांचे कपडे घालून हे साध्य करता येते.

समुपदेशन

रोगाचे शरीरांतर्गत आणि सौंदर्यशास्त्रीय दृष्टीने स्वरूप समजून घेतल्याने मानसिक त्रास टाळण्यास मदत होऊ शकते. संपूर्ण उपचार पद्धतीचा अंगीकार करत असताना उपचारांची मर्यादाही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या उपचारपद्धतीत डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करणे आणि सहकार्य करणे यांच्यामुळे चांगले परिणाम दिसतात.

प्र. 11 मुलांमधील व्हीटीलिगो वर कसे उपचार होतात?

अ. व्हीटीलिगो लहान मुलांनाही होऊ शकतो. प्रौढांच्या तुलनेत मुलांमधील उपचारांचे कमी पर्याय आहेत.

ब. मुलांना एनबी–यूव्हीबीचा वापर करता येईल परंतु सोरालिन आणि यूव्हीए प्रकाश हे 12 वर्षे वयावरील मुलांसाठीच सुचवण्यात आले आहे.

क. त्वचेवर लावण्याचे क्रीम आणि मलम वापरता येईल परंतु त्याचा वापर फक्त त्वचारोगतज्ञांच्या सल्ल्यानेच करण्यात यावा.

प्र. 12 व्हीटीलिगो बरा होऊ शकतो का आणि तो पुन्हा उद्‌भवण्याची शक्यता किती असते?

व्हीटीलिगो हा ऑटो इम्युन रोग आहे आणि इतर ऑटो इम्युन रोगाप्रमाणेच तो पूर्णपणे बरा होऊ शकत नाही.

उपचारांनी त्याची प्रगती मंदावू शकते आणि अनेक प्रकरणी रोगाचा प्रसार रोखता येईल. तथापि, उपचार थांबवल्यावर रोग पुन्हा उद्‌भवू शकतो.

सुरूवातीच्या टप्प्यावर व्यक्तीने त्वचारोगतज्ञाचा सल्ला घेतल्यास व्हीटीलिगोवर चांगले उपचार होऊ शकतात.

योग्य उपचार आणि नियमित पाठपुरावा यांच्यामुळे रंगद्रव्य पूर्ण निर्माण होण्याची शक्यता वाढते.

प्र. 13 व्हीटीलिगो झालेली व्यक्ती लग्न करू शकते का आणि पोहणे, कुस्ती यांच्यासारखे खेळ खेळू शकते का?

हो. व्हीटीलिगो असलेली व्यक्ती लग्न करू शकते.

व्हीटीलिगो संसर्गजन्य नाही आणि या रोगाने ग्रस्त कोणत्याही व्यक्तीला शारीरिक संपर्क येणाऱ्या कोणत्याही उपक्रमांपासून दूर राहण्याची गरज नाही.

शाळकरी मुलांबाबत शिक्षक, शाळेतील इतर कर्मचारी आणि इतर मुलांच्या पालकांना रोगाच्या असंसर्गजन्य स्वरूपाबाबत जागरूक करणे महत्त्वाचे आहे आणि शाळेने मुलाचा/मुलीचा मित्रांकडून मानसिक छळ होऊ नये याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

घोषणाः

हे माहितीपत्रक केवळ रूग्णांच्या माहितीसाठी आहे आणि स्वतःहून उपचारांसाठी नाही.
रोगाच्या स्वतःहून केलेल्या उपचारांमुळे कोणतेही दुष्परिणाम झाल्यास आयएडीव्हीएल त्याची कोणतीही कायदेशीर जबाबदारी घेत नाही. छायाचित्रे फक्त रोग दर्शवण्यासाठी असून ती इतर कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येऊ नयेत.

रूग्ण माहितीपत्रकासाठी वेबलिंग :
www.Iadvl.org/patient information leaflet

INDIAN ASSOCIATION OF DERMATOLOGISTS VENEREOLOGISTS & LEPROLOGISTS
IADVL
1973

INDIAN ASSOCIATION OF DERMATOLOGISTS, VENEREOLOGISTS AND LEPROLOGISTS

Vitiligo Patient Education Leaflet

(Marathi)

SUN PHARMA

प्र. 1 व्हीटीलिगो म्हणजे काय?

व्हीटीलिगो हा एक त्वचाविकार आहे ज्यात त्वचेतील रंगद्रव्याची निर्मिती करणाऱ्या पेशी ज्यांना 'मेलानोसाइट्स' म्हटले जाते त्या नष्ट होतात. मेलानोसाइट्सकडून 'मेलानिन'ची निर्मिती होते आणि त्यामुळे त्वचेला गव्हाळ रंग येतो. त्यामुळे या पेशी नष्ट झाल्यास रंग निघून जातो आणि त्वचेवर पांढरे चट्टे येतात.

प्र. 2 व्हीटीलिगो कशामुळे होतो?

व्हीटीलिगोचे नेमके कारण अज्ञात आहे. व्हीटीलिगो हा एक ऑटो इम्युन रोग असून तो अनुवांशिक असू शकतो.

कारणाबाबत तीन प्रकारच्या संकल्पना आहेतः–

1. नसांचे कार्य बिघडल्यामुळे नसांमधून रक्तपुरवठा बिघडतो आणि मेलानोसाइट्सचे नुकसान होते.
2. कधीकधी, शरीर स्वतःच्या पेशी बाहेरून आलेल्या पेशी असल्याचे समजून नष्ट करते. याला ऑटो इम्युन प्रतिक्रिया म्हणतात आणि हे ही मेलानोसाइटच्या नुकसानाचे कारण ठरू शकते.
3. काही संशोधकांच्या मते मेलानोसाइट्स स्वतःहून नुकसान करू शकतात आणि काही गोष्टी म्हणजे शारीरीक आघात बसणे यांच्यामुळे त्यांचे स्वतःहून नुकसान करण्याची शक्यता वाढते.

प्र. 3 व्हीटीलिगो अनुवांशिक आहे का?

व्हीटीलिगो सुमारे 1 टक्के लोकसंख्येत आढळून येतो. व्हीटीलिगो विविध कारणांमुळे होत असल्यामुळे अनुवांशिक पद्धती गुंतागुंतीची आहे. सरासरी असे दिसून आले आहे की, एकूण 20 ते 30 टक्के व्हीटीलिगो रूग्णांच्या एका तरी नातेवाईकाला हा रोग झालेला आहे.

प्र. 4 कुटुंबातील सदस्य किंवा संपर्कातील व्यक्तींना व्हीटीलिगो संसर्गाने होतो का?

नाही. व्हीटीलिगो कुटुंबातील सदस्य किंवा संपर्कांना संसर्गजन्य नाही.

प्र. 5 या रोगाला कारण ठरणारे किंवा वाढवणारे काही घटक आहेत का?

भावनिक ताणतणाव, मानसिक त्रास किंवा काही मोठ्या रोगानंतर लगेचच रंगद्रव्य नष्ट झाल्याचे दिसून आले आहे.

कधीकधी एखाद्या ठिकाणी शारीरीक आघात बसल्यावर त्या भागात रोग जास्त वाढण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

रोगाचे दिसणे किंवा कायम राहणे यांत आहाराची काही भूमिका असल्याचे दिसत नाही.

व्हीटीलिगो संसर्गजन्य नाही. म्हणजेच, तो स्पर्शाने पसरत नाही.

प्र. 6 व्हीटीलिगो कसा दिसतो?

व्हीटीलिगोमध्ये त्वचेवर पांढरे किंवा पांढुरके चट्टे दिसून येतात. त्या भागातले केसही रंग सोडतात आणि पांढरे होऊ शकतात. रंग जाण्याखेरीज व्हीटीलिगोने बाधित त्वचा पूर्णपणे सामान्य दिसते.

प्र. 7 व्हिटिलिओने शरीरातल्या कोणत्या भागांवर परिणाम होतो?

व्हीटीलिगो शरीराच्या विविध भागांमधील त्वचेवर परिणाम करू शकतो. विविध प्रकारचे व्हीटीलिगो हे त्याच्या उपस्थितीच्या भागांवर आधारित दिसून येतात.

अ. **ओठांवरील व्हीटीलिगो** : ओठ आणि हाता/पायांच्या बोटांचा टोकाकडचा भाग.

ब. **एकरेषीय व्हीटीलिगो** : एका सरळ रेषेत शरीराच्या एका भागाचा सहभाग.

क. **स्थानिक व्हीटीलिगो** : त्वचेच्या एका छोट्या स्थानिक भागाचा सहभाग.

ड. **सर्वसामान्य व्हीटीलिगो** : शरीराच्या मोठ्या भागाचा सहभाग.

प्र. 8 एखाद्याला व्हीटीलिगो झाल्यास काय केले पाहिजे?

त्वचेवरील सर्व पांढरे चट्टे व्हीटीलिगो नसतात. त्वचारोगतज्ञ विविध प्रकारच्या पांढऱ्या चट्ट्यांमधला फरक ओळखायला शिकवतील.

त्वचारोगतज्ञ उपचारांची योग्य पद्धतही सांगतील आणि रूग्ण तसेच त्याच्या/तिच्या कुटुंबाला रोगाबाबत समुपदेशन करतील.

प्र. 9 व्हीटीलिगोच्या निश्चितीसाठी काही चाचण्या आहेत का?

अ. चिकित्साविशयक दृश्यता तसेच वूड्स लॅम्प तपासणीसारख्या बेड–साइड चाचण्यांद्वारे व्हिटिलिगोचे निदान केले जाऊ शकते.

ब. इतर चट्ट्यांपासून व्हीटीलिगो वेगळा ठरवण्यासाठी त्वचेचा एखादा छोटासा भाग तपासला जाऊ शकेल. (त्वचेची बायोप्सी)

क. व्हीटीलिगो असलेल्या रूग्णांपैकी 15 टक्के रूग्णांना इतर ऑटो इम्युन रोग असू शकतात जसे थायरॉइड, संधिवात, मधुमेह, एनिमिया इत्यादी. या रोगाच्या उपस्थितीची पुष्टी करण्यासाठी रक्त चाचण्या आवश्यक असू शकतात.

प्र. 10 व्हीटीलिगोवर उपचार कसे केले जातील?

उपचाराचे उद्दिष्ट हे रोगाचा प्रसार नियंत्रित करणे आणि रंगद्रव्य नष्ट झालेल्या ठिकाणी पुन्हा निर्माण करणे हे आहे. उपचारांची ही निवड संख्या, स्थान, रोगाचा प्रसार तसेच रूग्णाची सोय यांवर आधारित राहून केली जाते. तसेच कॅमोफ्लाज उपचारांमुळे रूग्ण उपचार घेत असताना सामाजिक समस्या कमी करण्यास मदत होईल.

उपचारांचे विविध पर्याय

वैद्यकीय उपचार

वैद्यकीय उपचारांमध्ये तोंडाद्वारे औषधे आणि त्वचेवर लावण्याच्या मलमांचा समावेश असतो. त्यामुळे रोगाचा प्रसार थांबवण्याचे तसेच अनेक ठिकाणी रंगद्रव्य पुनर्स्थापित करण्याचे उद्दिष्ट साध्य केले जाते.

यूव्ही उपचार

अल्ट्राव्हायोलेट प्रकाश उपचारांमध्ये बाधित जागेला यूव्हीए किंवा यूव्हीबी प्रकाशात आणण्याचा समावेश आहे. यूव्हीए उपचार हे सामान्यतः सोरेलेन या औषधासोबत दिले जातात. हे औषध तोंडाद्वारे वापरले जाते किंवा मलमासारखे लावले जाऊ शकते आणि नंतर बाधित जागा यूव्हीए प्रकाशाच्या संपर्कात आणली जाते. नॅरो बँड यूव्हीबी प्रकाश (एनबी–यूव्हीबी) सामान्यतः रूग्णाला प्रकाशाच्या चौकटीत उभे करून किंवा स्थानिक जागा एका एनबी–यूव्हीबी प्रकाशाच्या संपर्कात आणून उपचार दिले जातात. आठवड्याला दोन–तीन दिवस या वारंवारतेने यूव्ही प्रकाश उपचारांच्या अनेक सत्रांची गरज असते.

शस्त्रक्रिया उपचार

शस्त्रक्रिया उपचारांमध्ये व्यक्तीच्या शरीरातील त्वचेचे तुकडे घेऊन संपूर्ण त्वचा किंवा मेलानोसाइट्स (रंगद्रव्य निर्मिती पेशी) बाधित जागेत प्रत्यारोपित केले जातात. रोग स्थिर असताना म्हणजे आकार किंवा संख्येने वाढत नसल्यास हे केले जाते. शस्त्रक्रियात्मक ग्राफ्टिंग पद्धतींमध्ये पंच ग्राफ्टिंग, ब्लिस्टर ग्राफ्टिंग, स्मॅश ग्राफ्टिंग आणि मेलानोसाइट ट्रान्सफर शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे.